REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# यशवंतराव चव्हाण : एक साहित्यिक आणि वक्ते

**प्रा. जनार्धन परकाळे**
**शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज.**

## प्रास्ताविक



भारताच्या स्वातंत्र्याची पासष्टी झाली आहे. महाराष्ट्राच्या स्थापनेलाही बावन्न वर्षे होऊन गेली, स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील पाचसहा दशकांवर आली स्वतःची अशी मुद्रा उटवणाऱ्या असामान्य, सुसंस्कृत नेत्याचे म्हणजेच कालवश यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्धीचे हे वर्ष आहे. त्यांना कालवश होऊनही आता अठ्ठावीस वर्षे झाली. पण, तरीही यशवंतरावांनी दिलेल्या विचारधनाचा आणि घालून दिलेल्या पायवाटेचा विचार केल्याशिवाय, किंबहुना त्याबाबत कृतज्ञता व्यक्त केल्याशिवाय आपण पुढेच जाऊ शकत नाही.

यशवंतरावांनी अतिशय उत्तुंग कामगिरी केलेली आहे. आपल्या कुशल नेतृत्त्वाने त्यांनी महाराष्ट्राला दिशा तर दिलीच दिली, पण देशाच्या राजकारणातही महाराष्ट्राला पुढे नेले. द्वैभाषिक मुंबई राज्याचे ते पहिले मुख्यमंत्री होते. तसेच, स्वतंत्र महाराष्ट्राचेही ते पहिले मुख्यमंत्री होते. त्यानंतर केंद्र सरकारमध्येही संरक्षण, गृह, अर्थ, परराष्ट्र अशी महत्त्वाची खाती त्यांनी सांभाळली. भारताचे उपपंतप्रधानपदही त्यांनी भूषविले. आपले राजकारण त्यांनी समाजाची सर्वांगीण प्रगती होण्यासाठीच केले. महाराष्ट्राची प्रतिमा भारतात आणि भारताची प्रतिमा जगभर कशी उंचावत राहील, हे हा नेता सातत्याने पाहात राहिला. साहित्य, कला, रसिकप्रिय असलेले यशवंतराव विचारवंत नेते होते. अभिजात सुसंस्कृतपणा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग होता. त्यांची स्वतःची अशी पक्की वैचारिक बैठक होती. त्यांना परिस्थितीचे व्यापक भान होते. तेवढी वैचारिक उंची आणि व्यापकता त्यांच्यानंतर महाराष्ट्रातील सत्ताधारी वर्गातील कोणालाही गाठता आलेली नाही.

यशवंतराव हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. या लेखामध्ये आपण त्यांच्या साहित्यिक व वक्ता या पैलूंची नोंद घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. कारण, या दोन्हीही क्षेत्रांत त्यांची स्वतःची अशी ओळख आहे. बहुप्रसवी लेखक नसूनही ते उत्तम दर्जाचे साहित्यिक म्हणून गोरवले गेले आणि मितभाषीपणा हा अंगभूत गुण असूनही ते प्रगल्भ वक्ते म्हणून ओळखले गेले. महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणात तीन-चार दशके सर्वोच्च स्थानी राहूनही एक राजकारणी म्हणऊन ओळखले जाण्याबरोबरच ते साहित्यिक व वक्ते म्हणूनही त्याच तोलाने गौरविले गेले यातच त्यांचे वेगळेपण आहे. अशी मान्यता मिळवणारे महाराष्ट्रातच नव्हेत, तर देशातही फार कमी नेते आहेत. यशवंतराव चव्हाण त्यापैंकी एक अग्रक्रमावरचे नाव आहे. लेखन आणि वक्तृत्त्वाच्या क्षेत्रांत एक चिंतनशील व्यक्ती म्हणून त्यांची असलेली ओळख, त्यांच्या अफाट व्यासंगातून तयार झालेली होती. यशवंतरावांवर आजवर इतक्या लोकांनी इतक्या दृष्टिकोनातून लेखन केलेले आहे की, त्यांच्याविषयी नवे काही लिहिणे, हे मोठे अवघड काम आहे. मात्र, त्यांच्या साहित्यविषयक भूमिका, त्यांची भाषणे, त्यांच्या विषयीचे लेखन या साऱ्यांतून आणि काही घटना, प्रसंग, किस्से यातून त्यांच्यातील साहित्यिक आणि वक्त्याचा शोध घेण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. आवडीच्या विषयांवरील पुस्तके जमविणे आणि सवडीने ती वाचणे, हा माझा एक छंद आहे, असे यशवंतरावांनीच लिहीलेले आहे. राजकारणी साहित्यिक आणि वक्ता हे तीन अमोल गुण यशवंतरावाच्या व्यक्तिमत्वात एकजीवपणे दिसून येतात. प्रा. ना. सी. फडके यांनी म्हटले आहे की, यशवंतराव मला अधिक प्रिय

वाटतात. ते साहित्यिक आणि वक्ता या दोन्ही नात्यांनी त्यांचे हे कौतुकास्पद नैपुण्य मला दिसते. त्यामुळे, हजारो लोकांची विराट सभा असो किंवा शेपाचशे निवडक श्रोत्यांची सभा असो, ती हमखास जिंकण्याचे कौशल्य यशवंतरावांनी कमाविलेले आहे. श्रोत्यांच्या भावनांना आव्हा करण्याचे आणि त्याचप्रमाणे वैचारिक प्रतिपादनानी श्रोत्यांना जिंकण्याचे दोन्ही प्रकारचे कौशल्य त्यांच्या वकृत्त्वात आढळतात. प्रतिपक्ष्याला घायाळ करण्याचे चातुर्य ते अनेकदा प्रकट करतात. त्यांच्या भाषणाला आवश्यक तेवढी विनोदाची झालरही असते. आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांचे भाषण अत्यंत प्रमाणबध्द आणि आटोपशीरही असते. ते अशाप्रकारे आपले भाषण संपवितात की, श्रोत्यांना वाटावे यशवंतराव आणखी बोलले असते तर बरे झाले असते. महाराष्ट्रातील नामांकित वक्त्यात त्यांची गणना आवश्य करावी लागेल.

यशवंतरावांच्या वक्तृत्त्वाबद्दल असा आदर व्यक्त करणारे ना. सि. फडके यशवंतरावांनी सह्याद्री मासिकाच्या दिवाळी अंकात शांतिचित्तेचे भस्म हा सन १९६४ साली जो लेख लिहिलेला होता. त्यावर प्रतिक्रिया देताना लिहतात. भावनेनं ओथंबलेले प्रभावी भाषणे नटलेल हे लेखन जी लेखणी करु शकते, ती साधीसुधी लेखणी नाही. श्रेष्ठ दर्जाचे अस्सल साहित्यिकांच्या हातात शोभावी अशीच ती आहे. यशवंतरावाच्या लिखाणाचा आस्वाद जेव्हा जेव्हा मी घेतो, तेव्हा तेव्हा माझ्या मनात येत, यशवंतरावांच्या रुपात महाराष्ट्राला आणि भारताला एक पहिल्या दर्जाचा नेता मिळाला खरा, परंतु ज्यांच्यावर पडलेल्या नेत्यापणाच्या ओझ्यामुळे यशवंतरावांच्या ठिकाणी जो ज्येष्ठ साहित्यिक आहे. त्यांचे पुर्ण वर्क्तृत्त्व प्रकट होत नाही. ही खेदाची गोष्ट आहे. असे म्हणावे लागेल. असे जरी असले तरी भावी काळात, त्यांच्यावरच प्रचंड साहित्य निर्माण होईल. याबद्दल मला तीळमात्र शंका नाही.

ना. सी. फडके यांनी यशवंतरावांची गायलेली थोरवी अगदी योग्यच आहे. यशवंतरावांची साहित्याकडे बघण्याची स्वत:चीच अशी एक व्यापक भुमिका होती. ना. सी. फडके यांच्या युगप्रवर्तक फडके या पुस्तक प्रकाशनारंभाचे यशवंतराव अध्यक्ष होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी ना. सी. फडकेंच्या साहित्याचे समग्र विश्लेषण केले. त्यामुळे ना. सी. सुखावलेही. पण भाषणाच्या अखेरीस ते म्हणाले कोणत्याही साहित्यिकाला युगप्रवर्तक म्हणणे कठीण आहे. कारण कोणत्याही व्यक्तीच्या मानानं युग हे फार मोठे लांबलचक असते. साहित्यिक कितीही थोर असला, मोठा असला, तरी त्या साहित्यिकाच्या कर्तुत्त्वाने त्या युगाला बांधून ठेवता येणार नाही, ही यशवंतरावांच्या विचारामधील शक्ती होती.

इतिहास, राजकारण आणि वाङःमय हे यशवंतरावांच्या व्यासंगाचे विषय होते. या आंतरिक जिव्हाळ्यापासून या विषयांवरचे त्यांचे वाचनही प्रचंड होते. वाचन आणि शब्दसामर्थ्याबाबत ते म्हणतात, साहित्यक्षेत्रात माझी मूळ आणि आवडती भूमिका ही रसिक वाचकांची आहे आणि मला वाटते की, ही वाचकाची भूमिका खऱ्या अर्थाने स्पर्धातील व टिकून राहणारी आहे. शब्दांच्या सामर्थ्यावर व सौंदर्यावर माझा नितांत विश्वास आहे. नवनिर्मितीचे सर्जनशाली कार्य जसे शब्द करतात, तसेच साम्राज्यशक्ती धुळीला मिळवण्याचे संहारक सामर्थ्यही शब्दांत आहे. कल्पना, विचार आणि शब्द यांचा त्रिवेणी संगम ही मानवी इतिहासातील एक जबरदस्त शक्ती आहे. शब्द हे साहित्यिकांचे प्रमुख शस्त्र आहे.

समाजजीवन प्रवाही राहते, चिरंत राहते, ते त्याच्याजवळच्या भौतिक सामर्थ्यांवर नाही, तर त्याच्या जवळच्या विचारधनावर, सांस्कृतिक मूल्यांवर, ही यशवंतरावांची भूमिका होती. संस्कृती, कला यांकडे पाहण्याची त्यांची दृष्टी व्यापक होती. ते म्हणाले होते, साहित्य, संगीत, नाटक, चित्रकला यांसारख्या कलांनी माणसाच्या जीवनाला समृध्दी आणलेली आहे. मानवाला सुसंस्कृत बनविले आहे. परंतु, एखादा माणूस साक्षर असूनदेखील सुसंस्कृत नसतो. कारण जीवनातील आनंद कसा लुटावा, हे त्याला ठाऊक नसते. कलेचे रहस्य जाणण्याची दृष्टी त्याला प्राप्त झालेली नसते. त्यामुळे जीवनात त्याचे मन कोठेच रमत नाही, त्याला कशापासूनदेखील विरंगुळा मिळत नाही. अशा प्रवृत्तीपासून आपण दूर राहिले पाहिजे.

राजकारणातील निरनिराळ्या जबाबदाऱ्या पेलत असताना, यशवंतरावांना विविध विषयांवरचे प्रचंड वाचन करावे लागे. त्यांनी जगातील अनेक नेत्यांची, साहित्यिकांची, वक्त्यांची चरित्रे अभ्यासलेली होती. त्यांच्याकडे कमालीची जिज्ञासु वृत्ती होती. त्यांनीच एके ठिकाणी म्हटले आहे, मी एक नम्र ज्ञानोपासक आहे आणि खरा ज्ञानोपास आपल्या अज्ञानाची जाणीव असणाराच असतो. ज्ञानाच्या सागराचे विस्तीर्ण स्वरुप नजरेपुढे येते व आपण करतो ते वाचन म्हणजे शिंपल्याचे पाणी पिण्याचा प्रयत्न आहे, असे जाणवते.

लेखक या नात्याने यशवंतरावांची स्वत:ची अशी तेरा पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यामध्ये १९६० साली त्यांनी लिहीलेल्या महाराष्ट्र-म्हैसूर सीमा प्रश्न या पुस्तिकेपासून त्यांच्या निधनानंतर १९८८ साली विदेश दर्शन या परदेशांतून वेणुताईंना लिहिलेल्या पत्रसंग्रहापर्यंतची पुस्तके आहेत. कृष्णाकाठ हा त्यांच्या आत्मचरित्राचा पहिला खंड १९८४ साली प्रसिध्द झाला. पुढचे दोन खंड यशवंतराव लिहून शकले नाहीत. अन्यथा, ते मराठीतील एक दर्जेदार व परिपूर्ण आत्मचरित्र ठरले असते. विचारधारा (१९६०), शिवनेरीच्या नौबती (१९६१) सह्याद्रीचे वारे (१९६२), युगांतर (१९७०), भूमकिा (१९७९) हे भाषणसंग्रह आणि ऋणानुबंध (१९७५) हा लेखसंग्रह त्यांच्या नावावर आहे, तर महाराष्ट्र राज्य निर्मिती विधेयक (१९६०) व याशिवाय परराष्ट्रधोरणावर तीन इंग्रजी पुस्तकेही त्यांनी लिहीली आहेत. एकूण त्यांच्या लेखनाकडे पाहिले की, रुढ अर्थाने

ज्याला साहित्य म्हटले जाते, अशा स्वरुपाची फार पुस्तके यशवंतरावांनी लिहिली नाहीत, पण त्यांनी जे काही थोडेफार लेखन केले, ते अतिशय नेमके व दर्जेदार केले. म्हणूनच साहित्यवर्तुळातही त्यांचा दबदबा कायम राहिला. यशवंतराव जे लिहीत आणि बोलत, ते मोचके, नेमके, मुद्देसुद असे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांच्यावर विचारांच्या भूमिकेतील असमानत्वामुळे आचार्य अत्र्यांनी प्रचंड टीका केली होती. पण तेच आचार्य अत्रे एके ठिकाणी लिहीतात, यशवंतरावांच्या बुध्दिमत्तेचा पल्ला केवळ राजकारणापुरताच मर्यादित नाही. ते एक साहित्यप्रेमी, कलाप्रेमी आणि नाट्यरसिक आहेत. त्यांना समाजजीवनाच्या सर्व अंगाविषयी रस आहे. ते उत्कृष्ट वक्ते, संभाषणचतुर, शिष्टाचारनिपुण आहेत. त्यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय प्रसन्न आहे. म्हणूनच आम्हाला त्यांच्याविषयी आपुलकी वाटते.

यशवंतराव, राजकारणाचे प्रमुख माध्यमही शब्दच आहेत, हे सांगून म्हणत की, साहित्यिक आणि राजकारणी हे शब्दबंधू आहेत. शब्दांचे आणि आमचे साहचर्य व सौहार्द फार जुने आहे. म्हणून तर यशवंतरावांचे सुधांशुंपासून ना. धो. महानोरांपर्यत, पु. ल. देशपांड्यापासून अनिल अवचटापर्यंत व भारतरत्न पं. भीमसेन जोशींपासून सुधीर फडकेंपर्यंत साहित्य व कलाक्षेत्रातील सर्वांशी ऋणानुबंध जुळले.

राजकारणी आणि साहित्यप्रेमी या दोन्ही भूमिका एकाच वेळी ते किती सजगतेने जगत, हे एका घटनेवरुन स्पष्ट होते. ख्यातनाम विचारवंत बा. ह. कल्याणकर यांनी सन १९८३ साली दिशा आणि दृष्टी या पुस्तकासाठी यशवंतरावांकडे प्रस्तावना मागितली. यशवंतरावांनी पुस्तकाची मुद्रणप्रत पाठवा मग प्रस्तावना देतो, असे सांगितले. त्याप्रमाणे कल्याणकरांनी त्यांना पुस्तकाची मुद्रणप्रत पाठविली. ती मुद्रणप्रत वाचून यशवंतरावांनी कल्याणकरांना पुढीलप्रमाणे पत्र लिहिले होते.

पत्रात यशवंतराव म्हणतात, शिवाजी महाराज व महात्मा फुले यांच्याबद्दलचे तुमचे लेख निरपवाद व उत्तम आहेत. परंतु चालू राजकीय परिस्थिती आणि त्यावरील तुमची निदाने वाचल्यानंतर माझ्या हे लक्षात आले की, तुमच्या पुस्तकासाठी मी प्रस्तावना लिहिणे अशक्य आहे. प्रस्तावना लिहायची म्हटले म्हणजे तुमच्या विचारांवर सपाटून टीका करावी लागेल आणि अशी प्रस्तावना लिहिण्याची माझी इच्छा नाही. कारण, मला तुमच्याबद्दल लोभ आहे व तुमच्या साहित्यगुणांबद्दल कौतुक आहे. स्पष्ट लिहिल्याबद्दल राग मानू नका. असेच प्रेम असू द्यावे. पण, त्याच यशवंतरावांनी १९८४ साली बा. ह. कल्याणकरांच्या सूर्यपंख या पुस्तकाला आनंदाने प्रस्तावना लिहिली. मृत्युपुर्वी दोन महिने अगोदर त्यांनी लिहिलेली ही प्रस्तावना म्हणजे बहुतेक त्यांचे साहित्य व वैचारिक क्षेत्रातील अखेरचे लेखन असावे.

हैदराबादच्या साहित्यसंमेलनात यशवंतरावांनी म्हटले होते, कधी साहित्यिक राजकारण्यांना मार्गदर्शन करतात, तर कधी राजकारणी साहित्यिकांना मार्गदर्शन करतात. असे हे सर्वत्रच चालत आलेले आहे. साहित्यिकाचा अनुभव देशव्यापक झाला पाहिजे. आमचे दुरभिमान आम्हीच सोडले पाहिजेत. आपले आग्रह बाजूला ठेवून इतरांचे प्रश्न समजावून घेण्याचे काम साहित्यिकांनी केले पाहिजे आणि त्यातून राजकारण्यांना प्रेरणा दिली पाहिजे, असे यशवंतरावांचे मत होते. साहित्य आणि समाज यांचा व्यापक विचार त्यांनी केलेला होता. त्यांची काही अवतरणे या ठिकाणी आपण लक्षात घेतली, तर त्यांचा विचारव्यूह स्पष्टपणे उलगडत जातो.

केवळ शब्दलालित्य म्हणजे साहित्य ही साहित्याची व्याख्या घेऊन त्या प्रमाणे चालण्याचा काळ संपलेला आहे. जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांशी अधिक निकटचे संबंध प्रस्तापित केल्याशिवाय आणि जीवनामध्ये असलेले श्लेष आणि काव्य यांच्याशी अधिक जवळीक केल्याशिवाय साहित्यात फारशी मोलाची भर कुणी घालू शकेल, असे मला वाटत नाही. तर आणखी एके ठिकाणी यशवंतराव लिहीतात, भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी जे विविधत्त्व आहे, त्याच्याशी आपण संपर्क साधला पाहिजे. त्याच्यातून अनुस्यूत असलेल्या एका भारतीयत्त्वाचा आपण अनुभव घेतला पाहीजे. हा अनुभव आमच्या साहित्याद्वारे लोकांपर्यंत जाऊन पोहोचला पाहिजे. साहित्यातूनच सुसंस्कार घडू शकतात, यावर यशवंतराव ठाम होते.

जीवन आणि समाज यांच्यातले जिवंत नाट्य लोकाभिमुखतेने पकडणारी कलाकृती हेच नाट्य, अशी अतिशय नेमकी व्याख्या यशवंतरावांनी केली होती. नांदेडच्या नाट्यसंमेलनात ते म्हणाले होते, प्रत्यक्ष जीवनाच्या अधिक जवळ आलेली नाटके लोकप्रिय होतात, यशस्वी होतात. नाटक जीवनाचा जितका खोल वेध घेईल, आम्हाला त्रस्त करणाऱ्या प्रश्नांना जितक्या जिव्हाळ्याने हात घालील, तितके ते तुम्हां आम्हाला जवळचे वाटणार आहे. ही दिशा अपरिहार्य आहे. तसेच, तारुण्य म्हणजेच काव्य, असेही ते सहजपणे म्हणून गेले.

यशवंतराव हे स्वयंप्रज्ञेनेच विचारवंत होते. म्हणून तर केवळ काळाबरोबर प्रवाहपतित न होता, हवा तसा काळ निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. या माणसाकडून आपल्याला नवे काही मिळले, याची लोकांनी नेहमी खात्री वाटायची. असा हा नेता होता. साहित्य, कलाक्षेत्रातील माणसांबद्दल त्यांना कमालीची आपुलकी होती. असे होते यशवंतराव, अशी होती त्यांची विचारधारा, अशी होती त्यांची लेखणी, अशी होती त्यांची वाणी! असा होता अंतरंगात सतत माणुसकीची ओल असलेला समाजकारणी!!

## संदर्भ

१) डॉ. सौ. जयश्री देवदत्त खांबेटे, सह्याद्रीचा सुर्य (२०१३), समाजवादी प्रबोधिनी, इंचलकरंजी.